राज्य निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतन/ कुटुंब निवृत्तिवेतनात सुधारणा करणेबाबत.
अंमलबजावणी संदर्भात सूचना

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
शासन परिपत्रक, क्रमांक: सेनिवे १०९९/३४४/सेवा-४
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: ५ जानेवारी २०००

*पहा:- (१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: सेनिवे १०९९/३०२/सेवा-४, दिनांक १५.११.१९९९*
*(२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: सेनिवे १०९९/३०३/सेवा-४, दिनांक १५.११.१९९९*
*(३) शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांक: सेनिवे १०९९/३०४/सेवा-४, दिनांक १५.११.१९९९*

## परिपत्रक

उपरोल्लेखित अनुक्रमांक १ येथील आदेशांनुसार १ जानेवारी १९९६ रोजी किंवा त्यानंतर निवृत्त/मृत झालेल्या/होणा-या कर्मचा-यांच्या प्रकरणी त्यांचे निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन/उपदान/निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण यांमध्ये सुधारणा करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. या आदेशांनुसार संबंधित निवृत्तिवेतनधारक कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांचे प्रकरणी, यथास्थिती, निवृत्तिवेतन, कुटुंब निवृत्तिवेतन, उपदान आणि निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण निर्धारित करणे आणि त्यांचे तात्पुरत्या तसेच अंतिम स्वरुपात प्रदान करणे याबाबतची विशेष कार्यपध्दती परिच्छेद-१३ मध्ये विहित करण्यात आलेली आहे.या आदेशांची अंमलबजावणी अधिक सुलभतेने व्हावी यादृष्टीने खालील प्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :-

(अ) प्रचलित कार्यपध्दतीनुसार तात्पुरते निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन व उपदान यांच्या रकमांची देयके, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नमुना २१ व. निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाच्या रक्कमांची देयके महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नमुना ४५ अ मध्ये कोषागारात सादर केली जातात. निवृत्तिवेतन, उपदान व निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाच्या रकमांसंबंधीची ही देयके जरी एकाच प्रधान शीर्षाखाली खर्ची पडत असली तरी त्यांचे उपशीर्ष वेगवेगळे असल्यामुळे तसेच या रकमांबाबतची माहिती त्वरित उपलब्ध व्हावी या दृष्टीने विभाग/कार्यालय प्रमुखांनी निवृत्तिवेतन, उपदान व निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची रक्कम या रकमांसंबंधीचे एकच देयक सादर न करता या प्रत्येकासंबंधीचे स्वतंत्र देयक, (वरील नमुन्यातच) संबंधित कोषागार कार्यालयास सादर करावे.

(ब) निवृत्तिवेतन, कुटुंब निवृत्तिवेतन, उपदान व अंशराशीकरणाच्या रकमांची थकबाकी निवृत्तिवेतनधारकांना तीन हप्त्यात प्रदान करावयाची असल्यामुळे या प्रत्येक बाबीच्या प्रत्येक हप्त्याची रक्कम परिगणित करुन ती संबंधित मंजूरी आदेशांमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात यावी.

(क) (१) विभाग/कार्यालय प्रमुखांनी निवृत्तिवेतन, उपदान व निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाच्या रकमांची थकबाकी मंजूर करण्यासंबंधीचे आदेश जोडपत्र-१ मध्ये दिलेल्या नमुन्यात काढावेत.

(२) विभाग/कार्यालय प्रमुखांनी निवृत्तिवेतनधारकांना तात्पुरत्या स्वरुपात निवृत्तिवेतनविषयक लाभ मंजूर केल्यानंतर अंतिमत: सुधारित निवृत्तिवेतनविषयक लाभ मंजूर करण्यासाठी त्याबाबतची कागदपत्रे यथास्थिती, महालेखापाल, मुंबई/ नागपूर यांना जोडपत्र-२ मध्ये दिलेल्या नमुन्यात पाठवावी.

(३) निवृत्तिवेतनविषयक लाभ जोडपत्र-३ मध्ये दिलेल्या नमुन्यात परिगणित करण्यात यावे.

(४)सुधारित निवृत्तिवेतन विषयक लाभांची थकबाकीची रक्कम जोडपत्र-४ मध्ये दिलेल्या नमुन्यात परिगणित करण्यात यावी.

(ड) अतिरिक्त निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याच्या रकमेची थकबाकी ही तीन समान वार्षिक हप्त्यात प्रदान करण्यात येत असल्यामुळे निवृत्तिवेतनाचा सुधारित अंशराशीकृत भागदेखील तीन समान वार्षिक हप्त्यात, ज्या दिनांकाला संबंधित हप्त्यांची थकबाकीची रक्कम प्रत्यक्षात प्रदान करण्यात आली असेल/येईल, त्या त्या दिनांकापासून मासिक निवृत्तिवेतनातून कमी करण्यात यावा. थकबाकीचा हप्ता वेळोवेळी संबंधित निवृत्तिवेतनधारकांस प्रत्यक्षात प्रदान करण्यात आल्यानंतर सुधारित अंशराशीकृत भाग मासिक निवृत्तिवेतनातून कोणत्या दराने व कोणत्या दिनांकापासून कमी करण्यात यावा याबाबतच्या माहितीसह सविस्तर तपशिल विभाग/कार्यालय प्रमुखांनी संबंधित कोषागार अधिकाऱ्यांना कळविणे बंधनकारक आहे.

(इ) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक निअंक-१०८६/१७७१/सेवा-४, दिनांक ३० मे १९८८ च्या तरतूदींनुसार सुधारित निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत भागाचे १५ वर्षानंतर पुन:स्थापन करताना तीन हप्त्यांपैकी प्रत्येक हप्ता ज्या दिनांकापासून मासिक निवृत्तिवेतनातून कमी करण्यात आलेला असेल त्या त्या दिनांकापासून १५ वर्षानंतर पुन:स्थापीत करण्यात येईल.

उपरोल्लिखित अनुक्रमांक (२) व (३) च्या आदेशांच्या संदर्भात खालील प्रमाणे खुलासा करण्यात येत आहे:-

(अ) ज्या प्रकरणी निवृत्तिवेतनधारक स्वत:च्या निवृत्तिवेतनाबरोबर कुटूंब निवृत्तिवेतनही घेत असेल अशा प्रकरणी निवृत्तिवेतन व कुटूंब निवृत्तिवेतन यांचे एकत्रिकरण शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-१०९९/३०३/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ च्या तरतुदीनुसार स्वतंत्रपणे करण्यात यावे.

(ब) निवृत्तिवेतनधारक/कुटूंब निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतन/कुटूंब निवृत्तिवेतनात सुधारणा करण्याची कार्यवाही करतांना ज्या प्रकरणी संबंधित निवृत्तिवेतनधारक/कुटूंब निवृत्तिवेतनधारकांनी विहित अर्जाच्या नमुन्यात माहिती भरुन विभाग/कार्यालय प्रमुखास सादर करणे आवश्यक ठरत असेल तेथे विहित अर्जाच्या प्रती संबंधित निवृत्तिवेतनधारक/कुटूंब निवृत्तिवेतनधारक यांना ते ज्या कोषागार कार्यालयातून मासिक निवृत्तिवेतन/कुटूंब निवृत्तिवेतन घेत असतील तेथील कोषागार अधिकाऱ्यांनी पुरविण्याची व्यवस्था करावी. विभाग/कार्यालय प्रमुखांनी देखील उपरोक्त विहित अर्जाच्या प्रती निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांना आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन द्याव्यात.

(क) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-१०९९/३०३/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ च्या तरतूदीनुसार १ जानेवारी १९९६ पूर्वीच्या निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनात/कुटुंब निवृत्तिवेतनात सुधारणा करताना निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकाऱ्यांनी (म्हणजे यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी) सुधारित निवृत्तिवेतनाच्या संवितरणाबाबतची माहिती, जोडपत्र-४ मधील विहित नमुन्यात संबंधित निवृत्तिवेतनधारक/कुटुंब

निवृत्तिवेतनधारकासही पाठविणे आवश्यक आहे. उपरोक्त जोडपत्राच्या प्रती निवृत्तिवेतनधारकांना महजरीत्या प्राप्त व्हाव्या यादृष्टीने कोषागार अधिकाऱ्यांनी निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारक जे बँक शाखांमधून निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन घेत आहेत त्यांच्या जोडपत्र-४ च्या प्रती संबंधित बँक शाखेकडे पाठवाव्यात व अशी कार्यवाही केल्यानंतर निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांनी त्या तेथून प्राप्त करण्यासंबंधात वृत्तपत्राद्वारे (Press-Note) सुचना देण्यात याव्यात. जे निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारक परस्पर कोषागारातून निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन घेत असतील त्यांना कोषागार कार्यालयाने जोडपत्र-४ च्या प्रती द्याव्यात.

(ड जर निवृत्तिवेतनधारक त्यांचे निवृत्तिवेतन, त्याच्या निवृत्तिवेतनाच्या वेळी तो सेवेत असलेल्या मुख्यालयाच्या कोषागार कार्यालयातून न घेता, अन्य ठिकाणच्या कोषागाराकडून घेत असेल तर अशा प्रकरणी सुधारित दराने तात्पुरते निवृत्तिवेतन, उपदान व निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाचे मंजूरीचे आदेश काढणाऱ्या विभाग/कार्यालय प्रमुखाची "नमुना स्वाक्षरी" त्या कोषागार कार्यालयात उपलब्ध असणार नाही. त्यामुळे देयके पारित करतांना कोषागार अधिकाऱ्यास अडचणी येऊ नयेत यादृष्टीने सुधारित दराने तात्पुरते निवृत्तिवेतनाचे मंजूरी आदेश काढणाऱ्या विभाग/कार्यालय प्रमुखाने आपली "नमुना स्वाक्षरी" स्थानिक कोषागार अधिकारी यांचेकडुन सांक्षांकित करुन ती उपरोल्लिखित मंजूरी आदेशांसोबत निवृत्तिवेतनधारक जेथून नियमित निवृत्तिवेतन घेत आहेत त्या कोषागार कार्यालयाकडे पाठवावी.

(: वरीलप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात निवृत्तिवेतनविषयक लाभ प्रदान करण्यात आलेली प्रकरणे जेव्हा महालेखापाल, मुंबई/नागपूर यांचेकडून अंतिम स्वरुपात मंजूर होतील त्यावेळी महालेखापालांकडून अंतिम सुधारित निवृत्तिवेतन प्रदान आदेश/उपदान प्रदान आदेश/निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य प्रदान आदेश प्राप्त झाल्यानंतर विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी, पूर्वी तात्पुरत्या स्वरुपात अनुज्ञेय ठरलेले लाभ प्रत्यक्षात प्रदान करण्यात आल्यासंबंधीचे प्रमाणपत्र (सविस्तर तपशिलासह) संबंधित कोषागार कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक राहील. जेणेकरुन सदरहु प्रमाणपत्राच्या आधारे आवश्यक ती समायोजनाची कार्यवाही संबंधित कोषागार कार्यालयास करता येईल.

३. असाही खुलासा करीत आहे की, ज्या निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना असुधारित वेतनावर आधारीत निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन विषयक लाभ, यथास्थिती, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्य १२६, नियम १३०, नियम १४० व शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-१०९९/३४/सेवा-४, दिनांक ई १९९९ च्या तरतूदीनुसार मंजूर करण्यात आलेले आहेत, त्यांचे तात्पुरते निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेत लाभही वरील आदेशांनुसार तात्पुरत्या स्वरुपात सुधारित करण्यात यावेत.

४. ग/कार्यालय प्रमुखांनी/कोषागार अधिका-यांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वसंत वा. चौधरी,
शासनाचे उप सचिव.

H-970+40-1-0012

प्रति,

भारत सरकारचे सचिव,वित्त मंत्रालय, नवी दिल्ली,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५ प्रती),
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
मुख्य लेखा अधिकारी, बी ब्लॉक, दिल्ली प्रशासन, विकास भवन, नवी दिल्ली (५ प्रती),
नियंत्रक, लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली (१० प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (५१० प्रती),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १० प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई.
मंत्रालयातील सर्व विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (११ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

---

*पत्राद्वारे.

## जोडपत्र - १

## निवृत्तिवेतन विषयक लाभ मंजूर करण्याबाबतच्या आदेशांचा नमुना

क्रमांक:

महाराष्ट्र शासन
विभाग/कार्यालय.........................
दिनांक:

**ज्ञापन :-**

१. श्री/श्रीमती ..................................... हे/हया या कार्यालयात ........................... पदावर कार्यरत असतांना दिनांक ........................ रोजी सेवानिवृत्त झाले/झाल्या/मृत्यू पावले/पावल्या.

२. त्यांचे निवृत्तिवेतन विषयक प्रकरण महालेखापाल, मुंबई/नागपूर यांनी सुधारणापूर्व वेतनाच्या आधारे अंतिम केलेले असून त्याबाबतचा तपशिल सोबतच्या जोडपत्रात दर्शविण्यात आला आहे.

**अथवा**

त्यांना या कार्यालयाचे आदेश/ज्ञापन क्रमांक ............................................................................ दिनांक ......................अन्वये सुधारणापूर्व वेतनाच्या आधारे तात्पुरत्या स्वरुपात निवृत्तिवेतन विषयक लाभ मंजूर केले असून त्याबाबतचा तपशिल सोबतच्या जोडपत्रात दर्शविण्यात आलेला आहे.

**अथवा**

त्यांना आतापर्यंत कोणतेही निवृत्तिवेतन विषयक लाभ मंजूर करण्यात आलेले नाहीत.

३. त्यांचा निवृत्तिवेतन प्रदान आदेश क्रमांक ........................... हा असून ते सध्या .............................. कोषागारात ................................................ या बँकेमार्फत निवृत्तिवेतन घेत आहेत. त्यांच्या बँकेचा खाते क्रमांक ......................... हा आहे.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९९८ मधील तरतुदीनुसार श्री/श्रीमती.....................................................यांचे वेतन दिनांक १ जानेवारी १९९६ रोजी ............................ या सुधारित वेतनश्रेणीत रु. ..................इतके निश्चित करण्यात आले आहे. त्यांच्या निश्चित करण्यात आलेल्या वरील वेतनाची वेतन पडताळणी पथकाकडून पडताळणी झालेली असून त्याची नोंद सेवा पुस्तकात करण्यात आलेली आहे अथवा त्यांच्या निश्चित करण्यात आलेल्या वरील वेतनाची वेतन पडताळणी पथकाकडून अद्याप पडताळणी करण्यात आलेली नाही. तरी उपरोक्त सुधारित वेतनाच्या वेतन पडताळणी पथकाकडून केल्या जावयाच्या वेतन पडताळणीच्या अधीन राहून त्यांना सुधारित वेतनाच्या आधारे अनुज्ञेय ठरणारे सुधारित निवृत्तिवेतन विषयक लाभ प्रदान केले जाणे आवश्यक आहे.

श्री/श्रीमती........................................................................यांना खालील प्रमाणे सुधारित निवृत्तिवेतनविषयक लाभ अनुज्ञेय ठरतात.

(१) सुधारित निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन
(२) सेवानिवृत्ती/मृत्यू उपदान
(३) निवृत्तिवेतनाची अंशराशीकृत मुल्याची रक्कम
(याबाबतचा तपशिल सोबतच्या जोडपत्रात दर्शविण्यात आला आहे.)

५.  श्री./श्रीमती ..............................................................यांना वर नमूद केलेले सुधारित वेतनश्रेणीतील निवृत्तिवेतनविषयक लाभ तात्पुरत्या स्वरुपात मंजूर करण्यात येत आहेत. त्यांचे प्रकरण महालेखापालांकडून अंतिमत: निकालात निघेपर्यन्त त्यांना सदरहू तात्पुरते निवृत्तिवेतन व त्यावर वेळोवेळी अनुज्ञेय असलेली महागाई वाढ अदा करण्यात यावी.

६.  शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-१०९९/३०२/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ च्या परिच्छेद-१३(ए) मधील तरतूदीनुसार श्री/श्रीमती .............................................. यांना दिनांक ...................... (यथास्थिती १.१.१९९६ किंवा सेवानिवृत्तीचा/मृत्यूचा दिनांक) ते दिनांक ३०.६.१९९९ या कालावधीची सुधारित निवृत्तिवेतन विषयक लाभांची एकूण थकबाकी रु..................... (निवृत्तिवेतन रु. ...........+ उपदान रु. ........... + निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य रु. ................) इतकी मंजूर करण्यात येत आहे. या थकबाकीची रक्कम तीन समान वार्षिक हप्त्यात द्यावयाची असल्याने वरील थकबाकीचा पहिला हप्ता रु. .................... अदा करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. सदरहू रक्कम त्यांना दिनांक ३१.३.२००० पूर्वी प्रदान करण्यात यावी. पुढील हप्त्यांच्या मंजुरीबाबतचे आदेश स्वतंत्रपणे काढण्यात येतील.

७.  सुधारित निवृत्तिवेतन विषयक लाभांच्या एकूण थकबाकीच्या रकमेत अतिरिक्त निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरण मूल्याच्या थकबाकीच्या रकमेचाही अंतर्भाव असल्यामुळे व सदरहू रक्कम तीन समान वार्षिक हप्त्यात देण्यात येत असल्यामुळे दिनांक ...................... ते पुढील हप्त्याची रक्कम प्रत्यक्षात प्रदान केली जाईपर्यंतच्या कालावधीसाठी मासिक सुधारित निवृत्तिवेतनातून रु................. इतकी रक्कम निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत भाग म्हणून कमी करण्यात यावी. या संदर्भात पुढील आदेश पुढील हप्त्याच्या मंजुरी आदेशांद्वारे देण्यात येतील.

८.  उपरोल्लिखित सुधारित निवृत्तिवेतन विषयक लाभ, सुधारित वेतनाची पडताळणी, वेतन पडताळणी पथकाकडून केली जाण्याच्या व महालेखापालांकडून अंतिम मंजुरीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहेत. यामध्ये जर अतिप्रदान झाले आहे असे निदर्शनास आले तर ते श्री/श्रीमती .............................................. यांनी दिनांक ........................ रोजी दिलेल्या वचननाम्यानुसार वसूल करण्यात येईल.

९.  वरील खर्च निवृत्तिवेतनधारकाचे निवृत्तिवेतनविषयक लाभ ज्या अर्थसंकल्पिय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शीर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

**कार्यालय/विभाग प्रमुख**

**सोबत:-** १) निवृत्तिवेतनविषयक लाभांचे विहित नमुन्यातील परिगणना पत्रक.
२) निवृत्तिवेतनविषयक लाभांची थकबाकी दर्शविणारे विहित नमुन्यातील परिगणना पत्रक.
३) "नमुना साक्षरी" चे कागदपत्र.

**प्रत,**

(१) कोषागार अधिकारी, ........... (जेथून निवृत्तिवेतनधारक असुधारित दराने निवृत्तिवेतन घेत आहे, त्या कोषागाराचे नांव) यांना अग्रेषित. त्यांना विनंती करण्यात येते की, आपल्या कोषागारातून सध्या असुधारित दराने मासिक निवृत्तिवेतन घेत असलेल्या वरील निवृत्तिवेतनधारकाचे निवृत्तिवेतन या आदेशानुसार सुधारित करुन त्यास दिनांक १.७.१९९९ पासून सुधारित दराने मासिक निवृत्तिवेतन प्रदान करण्यात यावे.

(२) कोषागार अधिकारी, ................ (ज्या कोषागारातून कार्यालय प्रमुख थकबाकीची रक्कम आहरीत करणार आहे त्या कोषागाराचे नांव)

(३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

(४) संबंधित निवृत्तिवेतनधारक.

(५) निवड नस्ती.

## जोडपत्र - २

क्रमांक:- कार्यालयाचे नांव

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ),
महाराष्ट्र १/२
मुंबई / नागपूर.

विषय:- श्री./श्रीमती.
यांचे निवृत्तिवेतन /उपदान सुधारित करणेबाबत.
निवृत्तिवेतन प्रदान आदेश क्रमांक:-

महोदय,

श्री./श्रीमती ______________________________ हे या कार्यालयातील ______________ पदावर कार्यरत असतांना दिनांक __________ रोजी सेवानिवृत्त झाले/मृत्यू पावले.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९९८ नुसार त्यांचे सुधारित वेतनश्रेणीत वेतन निश्चित करणेत आले असून शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: सेनिवे १०९९/३०२/सेवा-४, दिनांक १५.११.१९९९ नुसार वेतन पडताळणीच्या अधिन राहून त्यांचे सेवा निवृत्ती विषयक लाभ निश्चित करणेचे आदेश या कार्यालयाच्या आदेश क्रमांक ______________________ नुसार काढणेत आले आहेत, सोबत आदेशाची प्रत व संबंधिताचे सेवा पुस्तक पुढील कार्यवाहीसाठी सादर करणेत येत आहे.

३. उपरोक्त विषयांकित निवृत्तिवेतन प्रदान आदेश क्रमांक : ______________________ नुसार श्री./श्रीमती. ______________________ हे कोषागार कार्यालय ______________________ येथून ______________________ या बँकेमार्फत सेवा निवृत्तिवेतन घेत आहेत.

४. शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १५.११.१९९९ मधील तरतुदीनुसार निवृत्तिवेतन,उपदान व निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याची रक्कम यांच्या थकबाकीचे दिनांक __________ ते दिनांक ३०.६.१९९९ या कालावधीचे प्रदान या कार्यालयामार्फत करणेत येत आहे व दिनांक १.७.१९९९ पासून सुधारित दराने निवृत्तिवेतन देणेबाबत कोषागार अधिकारी ______________ यांना कळविण्यात येत आहे.

५. वेतन पडताळणी पथकाकडून श्री / श्रीमती ______________________ यांच्या सुधारित वेतनाची पडताळणी आता करण्यात आलेली असून, त्याबाबतची योग्य ती नोंद सेवापुस्तकात घेण्यात आलेली आहे.

६. तरी संबंधित प्रकरणी अंतिमरित्या सुधारित निवृत्तिवेतन , सेवानिवृत्ती/मृत्यूउपदान व निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मुल्याची रक्कम निश्चित करुन त्यासंबंधीचे आदेश निर्गमित करण्यात यावे, ही विनंती.

आपला,

नाव
( कार्यालय प्रमुख )

सोबत:- वरीलप्रमाणे

प्रत :-

कोषागार कार्यालय, ________________ यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित. श्री./श्रीमती________________ यांचे निवृत्तिवेतन आदेश क्रमांक ________________ नुसार सुधारित करणेत आले असून सोबत प्रत जोडणेत येत आहे. या आदेशानुसार त्यांना थकबाकीच्या प्रथम हप्त्याचे प्रदान प्रत्यक्षात दिनांक ________रोजी करणेत आले असून त्यात रुपये________इतक्या निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मुल्याच्या रकमेचा थकबाकीचा देखील समावेश आहे. शासन निर्णयातील तरतूदीनुसार त्यांच्या सुधारित निवृत्तिवेतनाची नोंद आपल्या अभिलेखांमध्ये घेऊन त्यांना दिनांक १ जुलै १९९९ पासूनच्या सुधारीत निवृत्तिवेतनाची थकबाकी रुपये ________व सुधारित मासिक निवृत्तिवेतनाचे प्रदान तात्पुरत्या स्वरुपात ( महालेखापालांच्या अंतिम मंजूरीच्या अधीन राहून ) करण्यात यावे. त्यांना रुपये ________इतक्या निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची रक्कम दिनांक ________रोजी प्रत्यक्षात अदा करणेत आली आहे. त्यामुळे त्या दिनांकापासून थकबाकीचा पुढील हप्ता प्रदान केला जाईपर्यन्त रुपये________इतक्या निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत भाग मासिक निवृत्तिवेतनातून कमी करण्यात यावा. पुढील अंशराशीकरणाचा तपशिल वेळोवेळी कळविण्यात येईल.

## जोडपत्र-३

# निवृत्तिवेतनविषयक लाभांचे परिगणना पत्रक

**(अ) तपशिल-**

| | | |
|---|---|---|
| (१) | नांव | :........................................ |
| (२) | पदनाम (सेवानिवृत्ती/मृत्युच्या वेळचे) | :........................................ |
| (३) | जन्मदिनांक | :........................................ |
| (४) | सेवेतील नियुक्तीचा दिनांक | :........................................ |
| (५) | शेवटचे असुधारित वेतन व असुधारित वेतनश्रेणी | :........................................ |
| (६) | शेवटचे सुधारित वेतन व सुधारित वेतनश्रेणी | :........................................ |
| (७) | वार्षिक वेतन वाढीचा दिनांक | :........................................ |
| (८) | सेवानिवृत्तीचा दिनांक | :........................................ |
| (९) | सेवानिवृत्तीचा प्रकार | :........................................ |
| (१०) | असुधारित दराने निश्चित केलेले/ प्राधिकृत करण्यात आलेले/मंजूर केलेले निवृत्तिवेतनविषयक लाभ | |
| | अ) निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन | :........................................ |
| | ब) सेवानिवृत्ती/मृत्यु उपदान | :........................................ |
| | क) निवृत्तिवेतनाची अंशराशीकृत मुल्याची रक्कम | :........................................ |
| | ड) निवृत्तिवेतनाची अंशराशीकृत मुल्याची रक्कम प्रत्यक्ष प्रदान केल्याचा दिनांक | :........................................ |
| (११) | अनु.क्र. १० मध्ये दर्शविलेले लाभ महालेखापालांमार्फत अंतिमत: मंजूर करण्यात आले आहेत की विभाग/ कार्यालय प्रमुखाने तात्पुरत्या स्वरुपात मंजूर केले आहेत. | :........................................ |
| (१२) | निवृत्तिवेतन प्रदान आदेश/उपदान प्रदान आदेश/निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण प्रदान आदेश यांचे क्रमांक व दिनांक | :........................................ |
| (१३) | तात्पुरते निवृत्तिवेतनविषयक लाभ मंजूर करण्यात आले असल्यास त्याबाबतच्या आदेशांचा क्रमांक व दिनांक | :........................................ |
| (१४) | मासिक निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन ज्या कोषागारातून प्रदान केले जाते, त्या कोषागार/उपकोषागार कार्यालयाचे नांव | :........................................ |
| (१५) | निवृत्तिवेतन बँकेमार्फत प्रदान केले जात असल्यास त्या बँकेचे नाव/खाते क्रमांक | :........................................ |

**(ब) निवृत्तिवेतनाची परिगणना :-**

निवृत्तिवेतनार्ह वेतन = (सेवेतील शेवटच्या १० महिन्यांच्या मूळ वेतनाची सरासरी)

| कालावधी (महिने) | मूळ वेतन |
|---|---|
| १) | |
| २) | |
| ३) | |
| ४) | |
| ५) | |
| ६) | |
| ७) | |
| ८) | |
| ९) | |
| १०) | ------------------------ |
| एकुण मूळ वेतन | ------------------------ |

*निवृत्तिवेतनार्ह वेतन = एकुण मूळ वेतन / १०*

**३३ वर्षाच्या अर्हताकारी सेवेच्या कालावधीसाठी निवृत्तिवेतन :-**

(अ) निवृत्तिवेतनार्ह वेतन रु. ..........................च्या ५० % = रु. ..............................

किंवा

(ब) सुधारित वेतनश्रेणीतील किमान वेतनाच्या ५० % = रु. ............................

वरील पैकी जे अधिक असेल ते

३३ वर्षापेक्षा कमी अर्हताकारी सेवेच्या कालावधीसाठी :-

(३३ वर्षे अर्हताकारी सेवेसाठी अनुज्ञेय होणारे निवृत्तिवेतन X प्रत्यक्षात झालेल्या एकुण सेवेचा सहामाही कालावधी) / ६६ = रु. ......................

**(क) सेवानिवृत्ती उपदानाची परिगणना :-**

अखेरचे वेतन :- रु. ........................

सेवानिवृत्ती उपदान = (अखेरचे वेतन x अर्हताकारी सेवेचा सहामाही कालावधी (जास्तीत जास्त ६६)) / ४ = रु. ........................

(जास्तीत जास्त रु. २,५०,००० इतक्या मर्यादेपर्यन्त)

*टिप :- मृत्यु उपदान प्रकरणपरत्वे नियमानुसार परिगणित करावे.*

**(ड) कुटुंब निवृत्तिवेतनाची परिगणना :-**

मूळ वेतन रु................. च्या ३० टक्के = रु. ........................
(किमान रु. १२७५ व कमाल रु. ७३५०)

श्री./श्रीमती/कु. ..........................................................यांच्या निवृत्तीनंतर दिनांक .................... पूर्वी मृत्यू झाल्यास, दिनांक ....................... पर्यन्त (मृत्युच्या दिनांकापासून सात वर्षे पूर्ण झाल्याचा किंवा वयाची ६५ वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक) त्यांच्या कुटुंबास दरमहा रु. .................... या वाढीव दराने कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय होईल व त्यानंतर दरमहा रु. ...................... या सर्वसाधारण दराने कुटुंब निवृत्तिवेतन मिळेल.

**(इ) निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याच्या रकमेची परिगणना :-**

| | |
|---|---|
| सेवानिवृत्तीचा दिनांक | : ................................................ |
| पुढील जन्मदिनांकास होणारे वय | : ................................................ |
| अंशराशीकरण मूल्य | : ................................................ |
| निवृत्तिवेतनाचा १/३ भाग | : ................................................ |

**अंशराशीकृत मुल्याची रक्कम = निवृत्तिवेतनाचा १/३ भाग x अंशराशीकरण मूल्य* x १२**

(* महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ मधील निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य दर्शविणारा तक्ता कृपया पहावा.)

| | |
|---|---|
| **(फ) निवृत्तिवेतनावरील महागाई वाढ**<br>(.......... % या दराने) | : ................................................ |

---

# जोडपत्र -४

## निवृत्तिवेतनविषयक लाभांची थकबाकी दर्शविणारे परिगणना पत्र

### निवृत्तिवेतन व महागाई वाढ

| | १-१-९६# ते ३१-३-९६ (रु. प्रतीमाह) | १-४-९६ ते ३०-६-९६ (रु. प्रतीमाह) | १-७-९६ ते ३१-१२-९६ (रु. प्रतीमाह) | १-१-९७ ते ३०-६-९७ (रु. प्रतीमाह) | १-७-९७ ते ३१-१२-९७ (रु. प्रतीमाह) | १-१-९८ ते ३०-६-९८ (रु. प्रतीमाह) | १-७-९८ ते ३१-१२-९८ (रु. प्रतीमाह) | १-१-९९ ते ३०-६-९९ (रु. प्रतीमाह) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ) अनुज्ञेय ठरलेली रक्कम<br>सुधारित मुळ निवृत्तिवेतन<br>वजा-<br>असुधारित निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत भाग*<br>अधिक-<br>सुधारित मुळ निवृत्तिवेतना वरील महागाई वाढ | | | | | | | | |
| एकुण (अ)... | | | | | | | | |
| ब) प्रदान केलेली रक्कम<br>असुधारित मुळ निवृत्तिवेतन<br>वजा-<br>असुधारित निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत भाग*<br>अधिक-<br>i)असुधारित मुळ निवृत्तिवेतना वरील महागाई वाढ<br>ii) अंतरिम वाढ-१<br>iii) अंतरिम वाढ-२<br>iv) अंतरिम वाढ-३ | | | | | | | | |
| एकुण (ब)... | | | | | | | | |
| (३) फरक= (अ) - (ब)= क<br>(४) एकुण महिने (ड)<br>(५) थकबाकी (क) x (ड) | | | | | | | | |
| निवृत्तिवेतन व महागाई वाढ याची थकबाकी | | | | | | | | |

थकबाकीचा पहिला हप्ता = निवृत्तिवेतन व महागाई वाढीचा एकुण थकबाकी x १/२ = रु **. ..................

* निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची रक्कम संबंधित निवृत्तिवेतनधारकास प्रत्यक्ष प्रदान केल्याच्या दिनांकापासून वजा करणे आवश्यक आहे. त्यानुसार विवरणपत्रातील स्तंभात (Column) प्रकरणपरत्वे बदल करण्यात यावा.

# संबंधित कर्मचारी दिनांक १-१-१९९६ रोजी सेवानिवृत्त झालेला असल्यास त्या दिनांकापासून अन्यथा तो दिनांक १-१-१९९६ नंतर ज्या दिनांकास सेवानिवृत्त झालेला असेल त्या दिनांकापासून थकबाकीची परिगणना करावी.

## सेवानिवृत्ती उपदान

| (रुपये) | (रुपये) |
|---|---|
| असुधारित शेवटचे वेतन ... <br> अधिक- महागाई भत्ता@ <br> शेवटच्या वेतनाच्या १७ % ... <br> उपदान ... (अ) | सुधारित शेवटचे वेतन ... <br> उपदान ...(ब) |
| उपदानाची एकूण थकबाकी = (ब) - (अ)= रु...................... | |
| उपदानाच्या थकबाकीचा प्रत्येक हप्ता = उपदानाची एकूण थकबाकी x १/३ = रु.** ...................... | |

## निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण

| (रुपये) | (रुपये) |
|---|---|
| असुधारित निवृत्तिवेतन ... <br> निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत भाग ... <br> (१/३ x निवृत्तीवेतन) <br> अंशराशीकृत मुल्याची रक्कम ...(क) | सुधारित निवृत्तिवेतन ... <br> निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत भाग ... <br> (१/३ x निवृत्तीवेतन) <br> अंशराशीकृत मुल्याची रक्कम ... (ड) |
| निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत रकमेची एकूण थकबाकी =(ड) - (क) = रु. ......................... | |
| अंशराशीकृत रकमेच्या थकबाकीचा प्रत्येक हप्ता = अंशराशीकृत रकमेची एकूण थकबाकी x १/३ = रु.** ................ | |

*** ही रक्कम अपूर्णांकांत आल्यास रुपयाच्या अपूर्णांकांत ०.५० किंवा त्यापेक्षा अधिक असलेला भाग पुढील रुपयात पूर्णांकित करावा. मात्र ०.५० पेक्षा कमी असलेला भाग वगळण्यात यावा.*

* * * * *

H-970(19,000+40-1-03)7.